# प्रेस नोट दि.१५/०४/२०२४

**दहा महिन्यापूर्वी बालिकेचे अपहरण केलेल्या गुन्हयाचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडून छडा लावलेबाबत**

पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्दीत फौजदार चावडी पोलीस ठाणे गुरनं. ३४२/२०२३ भादविसंक. ३६३ प्रमाणे दिनांक. ०५/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील अल्पवयीन बालिकेस गुन्हयातील निषन्न संशयीत आरोपी नामे राज दिपचंद कश्यप **राहणार संजय नगर, सुरत, राज्य गुजरात** यांनी कशाचे तरी अमिष दाखवून पळवून नेले असलेबाबत गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यातील अल्पवयीन बालिका व आरोपी यांचा फौजदार चावडी पोलीस ठाणे तत्कालीन तपासीक अंमलदार यांनी शोध घेवून देखील आरोपी व पिडीत बालिका यांचा शोध न लागल्याने सदरचा गुन्हा हा पुढील तपासकामी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, सोलापूर शहर येथे २३/११/२०२३ रोजी वर्ग करण्यात आला होता.

**सदरचा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबध कक्षाकडे तपासकामी गुन्हा वर्ग होताच तपासीक अधिकारी अश्विनी काळे पोलीस उप निरिक्षक** यांनी आरोपीचे सायबर पोलीस ठाणे याचे मदतीने मोबाईल बाबतची तांत्रिक माहिती प्राप्त करुन घेवून आरोपी नामे राज दिपचंद कश्यप व अपहृत बालिका यांना दिनांक १३/०४/२०२४ रोजी **प्लॉट नंबर २३/२४ संजय नगर, निलगिरी नगर, सुरत राज्य गुजरात** येथून ताब्यात घेवून पुढील कार्यवाही करीता फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे हजर केले असता फौजदार चावडी पोलीस ठाणे कडील तपासीक अधिकारी महिला पोलीस उप- निरिक्षक जेऊघाले हे पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त श्री. एम.राजकुमार, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) श्रीमती डॉ. दिपाली काळे व सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्रीमती प्राजंली सोनवणे, पोलीस निरिक्षक श्री महादेव राऊत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उप- निरिक्षक अश्विनी काळे, सफौ.राजेंद्र बंडगर, महिला सफौ अलका शिपुरे, पोना/७७० अ.सत्तार पटेल, चालक पोकॉ/७२४ दादा गोरे तसेच सायबर पोलीस ठाणे कडील पोहेकॉ/७७६ अविनाश पाटील, पोहेकॉ/६०१ प्रकाश गायकवाड, पोहेकॉ/२०८ मच्छिंद्र राठोड यांनी उत्कृष्ट व शिताफिने कामगीरी करून सदरची कार्यवाही केलेली आहे.

(प्रांजली सोनवणे)
सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे
सोलापूर शहर

Scanned with CamScanner